**नियमित खटला क्र.१७४/२००८ मधील निशाणी १ वरील आदेश**
**(सरकार वि. नदीम अख्तर हुसेन शेख)**

१) प्रस्तुत खटला आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

२) अभियोगपक्षाचे असे कथन आहे की, दिनांक २५/०३/२००८ रोजी १४.५० वा. च्या सुमारास फिर्यादी सुधीरभाई कृष्णा सुब्रमण्यम हे सिकंदराबाद एक्सप्रेस गाडीचे बोगी नं. ए १, सीट नं. ४३ वरुन सिकंदराबाद ते सामनगर असा प्रवास करीत असताना दिनांक २६/०३/२००८ रोजी सकाळी ०६.४५ वा. पुर्वी सदरची गाडी कल्याण रेल्वे स्टेशन येथे थांबून सुरु होण्यापुर्वी आरोपीने फिर्यादीचा झोपेचा फायदा घेउन त्यांचा मोबाईल फोन चोरी केली. म्हणून आरोपीविरुध्द प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे.

३) संचिकेचे अवलोकन करता दिसुन येते की, आरोपी हा खटल्यात गैरहजर रहात असल्याने व त्याच्या विरुध्द वारंवार अजामिनपात्र वॉरंट काढुनही ते मिळुन येत नसल्याने, दि. ०२/०१/२०२० रोजी हया न्यायालयाने आरोपी विरुध्द जाहिरनामा काढण्याचे आदेश पारीत केले. मात्र आरोपीविरुध्द जाहिरनामा प्रसिध्द होउनही मिळुन आले नाही त्यामुळे दिनांक २०/०३/२०२६ च्या निशाणी क्र.१ च्या आदेशान्वये प्रस्तुत खटला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे आरोपीच्या अनुपस्थितीत चालविण्यात आला.

४) प्रस्तुत प्रकरणातील कोणताही साक्षीदार मिळुन येत नाहीत त्यामुळे साक्षी समन्सची बजावणी करणारे पोलिस शिपाई आय.वाय.शेख हयांची साक्ष नोंदविली असता त्यांनी सांगितले की, ते कल्याण लोहमार्ग पोलिस ठाण्यात पोलिस शिपाई म्हणुन कार्यरत असुन त्यांच्याकडे प्रस्तुत खटल्यातील साक्षी समन्स बजावण्याकामी देण्यात आले होते. त्यातील फिर्यादी सुधीरभाई कृष्णा सुब्रमण्यम हे बाहेर राज्यातील असल्याने समन्स बजावणी झाली नाही. पंच शंकर रामचंद्र पाटणकर हे मयत झाले आहेत. पंच भारत भगवान झाडे हे त्यांच्या मुळ गावी सोलापुर येथे गेल्याने समन्स बजावणी करता आली नाही. साक्षीदार अखिल खान यांचा पत्ता अपुर्ण असल्याने समन्स बजावणी झाली नाही. साक्षीदार तुकाराम पांडुरंग सकपाळ पोलीस कर्मचारी यांची पोलीस आयुक्तालय कर्मचारी यांच्याकडे चौकशी केली असता काही एक माहिती मिळून आली नाही. तपासी अंमलदार बाळासाहेब गुलाब मुसळे हे मयत झाले आहेत. त्यामुळे सदर साक्षीदारांवर साक्षी समन्स बजावणी करण्यात आलेली नाही.

त्याबाबत त्यांनी दिनांक ०२/०५/२०२६ रोजी निशाणी क्र.०८ वर अहवाल सादर केला आहे.

५) प्रस्तुत खटला अनेक वर्षे जुना असुन आरोपी हा गेली अनेक वर्षोपासुन फरार असल्याने त्याच्यावर अद्याप दोषारोप सुध्दा निश्चित झालेला नाही. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षास कोणताही साक्षीदार हा साक्षीपुरावा नोंदविण्याकामी मिळुन येत नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे गुन्हयाची घटना व त्याबाबत देण्यात आलेली तक्रार तसेच गुन्हयातील जप्ती पंचनामा इ. बाबी सिध्द होउ शकतील असा कोणताही पुरावा पटलावर येत नाही. त्यामुळे भविष्यात जरी आरोपी मिळुन आले आणि त्याच्याविरूध्द दोषारोप निश्चिती करून खटला चालविण्यात आला तरी पटलावरील पुरावा पहाता सदरचा पुरावा आरोपीला दोषी ठरविण्या इतपत असल्याचे दिसुन येत नाही.

६) एकंदरीत अभिलेखावरील पुरावा पहाता, आरोपी विरूध्द कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नसल्याने संशयाच्या पलिकडे जाउन आरोपीस दोषी ठरवता येईल अशी परिस्थिती दिसुन येत नाही त्यामुळे प्रस्तुतचा खटला प्रलंबित न ठेवता, आरोपीस दोषमुक्त करुन खटला निकाली काढणे न्यायोचित ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १) | **आरोपी नदीम अख्तर हुसेन शेख** यांना प्रस्तुत खटल्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३९ अन्वये दोषमुक्त करण्यात येते. |
| २) | आरोपीचा जात मुचलका व जामिन बंधपत्र यापुर्वीच जप्त करण्यात आलेला आहे. |
| ३) | प्रस्तुत प्रकरणातील जप्त एक नोकीया कंपनीचा मोबाईलचा तक्रारदार यांना ताबा देण्यात यावा. |
| ४) | प्रकरण निकाली काढण्यात आले. |

VISHWAS PANDURANG SHINDE
Digitally signed by VISHWAS PANDURANG SHINDE
Date: 2026.07.02 14:58:39 +0530

(व्ही. पी. शिंदे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
लोहमार्ग न्यायालय, कल्याण

कल्याण
दिनांक : ०२/०७/२०२६